राज्य सागरमाला समितीचा
विस्तार करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक- पीडीई -१११४/प्र.क्र.१७०(भाग-१)/बंदरे-१,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा :</u>- शासन निर्णय क्रमांक- पीडीई -१११४/प्र.क्र.१७०/बंदरे-१, दिनांक १५.१०.२०१५

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्रिय मंत्रीमंडळाने दिनांक २५.०३.२०१५ रोजी सागरमाला कार्यक्रमाची संकल्पना व कार्यान्वयनासाठी संस्थात्मक रचना याकरिता मंजूरी प्रदान केली. सागरमाला प्रकल्पांतर्गत देशाच्या किनापट्टीचा वापर आर्थिक विकासाकरीता करुन घेण्यासाठी बंदर विषयक पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार आहे. महाराष्ट्राला ७२० कि.मी.चा समुद्र किनारा असून त्याचा पूर्ण क्षमतेने विकास केल्यास राज्याच्या एकूण आर्थिक व सामाजिक विकासास मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. त्यामुळे राज्य सागरमाला कार्यक्रम राबविणे राज्याच्या अत्यंत हिताचे आहे. त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या स्तरावर सागरमाला कार्यक्रमाचे समन्वयन, धोरणात्मक मार्गदर्शन व प्रकल्पांचा प्राधान्यक्रम निश्चिती इत्यादी करिता सर्व संबंधित विभागांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली राज्य सागरमाला समितीची माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे.

०२. राज्य सागरमाला योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांकरीता सागरतटीय व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांच्याकडून पर्यावरण विषयक दाखल प्राप्त करणे आवश्यक असते. तसेच भूसंपादन व वन विषयक दाखले प्राप्त करणे आणि मत्स्य विकास विभागाशी समन्वयासाठी संबंध येत असल्यामुळे, सागरमाला कार्यक्रमाचे समन्वय, धोरणात्मक मार्गदर्शन व प्रकल्प प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्यासाठी राज्य सागरमाला समितीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सागरमाला कार्यक्रमाचे समन्वय, धोरणात्मक मार्गदर्शन व प्रकल्प प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्यासाठी दिनांक १५.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या राज्य सागरमाला समितीमध्ये पर्यावरण विभाग, महसूल व वन विभाग (वन उपविभाग) तसेच मत्स्य विकास विभागांच्या सचिवांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे.

(१)	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, (पर्यावरण विभाग)	-	सदस्य
(२)	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,महसूल व वन विभाग (वने)	-	सदस्य
(३)	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, (मत्स्य विकास विभाग)	-	सदस्य

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१९१५२२५५३६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shaila Ravindra Mithbavkar

Digitally signed by Shaila Ravindra Mithbavkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8bb03c6d206c79568018ba9511400e3bd24537b79e0985b2d7a66c816ab002f9, cn=Shaila Ravindra Mithbavkar
Date: 2017.09.22 15:59:56 +05'30'

(शैला मिठबावकर)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (बंदरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, भारत सरकार, पोत परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली-११ ०००१
६) सचिव,मिनिस्ट्री ऑफ शिपींग (सागरमाला कक्ष), भारत सरकार, नवी दिल्ली-११०००१
७) अपर मुख्य सचिव, (उद्योग), उद्योग ,उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, (सा.बां.वि.),सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव, (उद्योग), उद्योग ,उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अप्पर मुख्य सचिव (पर्यावरण), पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (बंदरे व परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सचिव (मत्स्य विकास विभाग), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.
१९) निवड नस्ती (कार्यासन बंदरे-१).